

The Berar General Education Society's

# SITABAI ARTS, COM. & SCIENCE COLLEGE, AKOLA

## Dept. of SOCIOLOGY

## "Annual Departmental Activity"



(Session 2017-2022)

# SITABAI ARTS, COM. & SCIENCE COLLEGE, AKOLA

## UG & PG DEPT. OF SOCIOLOGY

## Annual Activity conducted under Department of Sociology

## Session (2017-2018)

# सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला

## पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभाग

### विभागाव्दारे आयोजित वर्षनिहाय कार्यक्रम

## Annual Activity conducted under Department of Sociology

### सत्र : २०१७–२०१८

**१) समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे उदघाटन :–**

समाजशास्त्र विभागात दि.१५ सप्टेंबर २०१७ रोजी समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटक व वक्ते म्हणून श्री. धाबेकर कला महाविद्यालय, खंडकी अकोला येथील समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. अमरिष गावंडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष विभागप्रमुख डॉ. दिनकर उंबरकर तर प्रमुख अतिथी म्हणून राज्यशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. रतन राठोड उपस्थित होते.

याप्रसंगी समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून कु. शुभांगी दामोदर व सचिव म्हणून विनोद देवकर यांची निवड करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी समाजशास्त्र अभ्यास मंडळाच्या कार्यपध्दतीबद्दल व विद्यार्थ्यांना भविष्यात येणाऱ्या आव्हानांबद्दल मार्गदर्शन केले.

**२) चर्चासत्र व उद्बोधन वर्गाचे आयोजन :–**

समाजशास्त्र विभागांतर्गत दि. १९ जानेवारी २०१८ रोजी 'समाजशास्त्र:– एक सामाजिक विज्ञान' या विषयावर पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री भाऊसाहेब लहाने महाविद्यालय पिंजर येथील समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. अनिल ठाकरे उपस्थित होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. दिनकर उंबरकर उपस्थित होते. याप्रसंगी पदव्युत्तर समाजशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी शोध निबंधांचे वाचन केले तसेच उपस्थित विद्यार्थ्यांना चर्चासत्राचे अध्यक्ष डॉ.दिनकर उंबरकर व प्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ. अनिल ठाकरे यांनी मार्गदर्शन केले.

३) वर्गामध्ये आयोजित गट चर्चा व चर्चासत्र :—

**अ.** विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी बी. ए. भाग—३ च्या विद्यार्थ्यांसाठी दि. ०१/०९/२०१७ रोजी ''सामाजिक मानवशास्त्राचे भारताच्या संदर्भात महत्व'' या विषयावर गट चर्चा आयोजित करण्यात आली. या गट चर्चेमध्ये एकूण ३० विद्यार्थी सहभागी झाले होते.

**ब.** बी. ए. भाग — १ च्या विद्यार्थ्यांसाठी दि. ०७/०९/२०१७ रोजी 'समाजशास्त्राची व्यवहारोपयोगी'' या विषयावर गट चर्चा आयोजित करण्यात आली. या गट चर्चेमध्ये एकूण ५७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**क.** एम. ए. भाग — १ च्या विद्यार्थ्यांसाठी दि. ०५/१०/२०१७ रोजी 'ग्रामीण स्थलांतरणाची कारणमिमांसा' या विषयावर चर्चासत्र आयोजित केले होते. या चर्चा सत्रामध्ये एकूण ३४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**ड.** बी. ए. भाग — २ च्या विद्यार्थ्यांकरीता दि. २१/१२/२०१७ रोजी 'शेतकरी आत्महत्या कार्यकारणभाव'' या विषयावर चर्चासत्र आयोजित केले होते यामध्ये एकूण २८ विद्यार्थी सहभागी झाले होते.

४) अभ्यास दौऱ्याचे आयोजन :—

**अ.** दि. ०५/१०/२०१७ रोजी बाल निरीक्षण गृहात राहणाऱ्या अल्पवयीन गुन्हेगारांच्या समस्या जाणून घेण्यासाठी विभागप्रमुख डॉ.दिनकर उंबरकर यांच्या मार्गदर्शनात शासकीय बाल निरीक्षणगृहाला पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभागातील विद्यार्थी व प्राध्यापकांनी भेट दिली. बाल निरीक्षणगृहात राहणाऱ्या अल्पवयीन मुलांच्या समस्या व परिस्थिती जाणून घेतली व तथ्य संकलनाद्वारे माहिती गोळा करुन आपला अहवाल विभागात सादर केला.

**ब.** दि. १०/१२/२०१७ रोजी वृध्दांच्या समस्या जाणून घेण्यासाठी विभागप्रमुख डॉ.दिनकर उंबरकर यांच्या मार्गदर्शनात मातोश्री वृध्दाश्रम खडकी (अकोला) येथे पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी भेट दिली व त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

**क.** समाजशास्त्र विभागांतर्गत येणाऱ्या पर्यावरण शिक्षण विभागाचा अभ्यास दौरा दि. २५/१२/२०१७ रोजी विभागप्रमुख डॉ. दिनकर उंबरकर यांच्या मार्गदर्शनात व प्रा. योगेश कराळे यांच्या आयोजनात चिखलदरा, मुक्तागिरी, मेळघाट येथे संपन्न झाला.

**ड.** दि. ०९ आणि १० फेब्रुवारी २०१८ रोजी विभागप्रमुख डॉ. दिनकर उंबरकर यांच्या मार्गदर्शनात व प्रा. दिलीप कुमरे यांच्या आयोजनात वेरुळ, दौलताबाद, जायकवाडी व औरंगाबाद तसेच दि. २८/०२/२०१८ रोजी लोणार सरोवर व सिंदखेड राजा येथे शैक्षणिक दौरा आयोजित करण्यात आला. ऐतिहासिक, पर्यावरणीय, सामाजिक व सांस्कृतिक उद्देशपूर्तीच्या उद्देशाने आयोजित या अभ्यास दौऱ्यामध्ये विद्यार्थ्यांनी तथ्य संकलन करुन आपला अहवाल अभ्यास दौऱ्यानंतर विभागात सादर केला.

**५) संशोधन क्षेत्रातील योगदान :—**

सत्र २०१७—२०१८ या शैक्षणिक सत्रात विभागप्रमुख डॉ. दिनकर उंबरकर यांच्या मार्गदर्शनात ०४ विद्यार्थ्यांनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची पीएच.डी.(आचार्य) पदवी प्राप्त केली.

विभागप्रमुख डॉ.दिनकर उंबरकर यांनी NAAC चे Co-ordinator पद यशास्वीरित्या सांभाळून महाविद्यालयाला 'A' मानांकन प्राप्त करुन देण्यात मोलाची भूमिका बजावली.

या शैक्षणिक सत्रात विभागप्रमुख दिनकर उंबरकर यांनी बॅकॉक येथे आयोजित आंतरराष्ट्रीय चर्चासत्रामध्ये सहभागी होवून शोध निबंधाचे वाचन केले. या प्रसंगी त्यांना Distinguished Research Award प्रदान करण्यात आला.

या शैक्षणिक सत्रात विभागप्रमुख डॉ. दिनकर उंबरकर यांनी आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये ०९ शोधनिबंध, राष्ट्रीय जर्नल्समध्ये ०५ शोध निबंध प्रकाशित केले आणि ते समाजशास्त्र विषयाच्या ०२ कार्यशाळांमध्ये सहभागी झाले.

सत्र २०१७—१८ या शैक्षणिक सत्रात विभागातील प्रा. सुनिल गायगोळ यांनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात सामाजिक शास्त्रांतर्गत दिल्या जाणाऱ्या पीएच.डी. (आचार्य) पदवीसाठी शोध प्रबंध सादर केला.

या शैक्षणिक सत्रात विभागातील प्रा. सुनिल गायगोळ यांना यु.जी.सी. च्या लघु शोध प्रकल्पाची (MRP) मान्यता मिळाली. तसेच त्यांनी ०५ आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये शोध निबंध प्रकाशित केले व समाजशास्त्र विषयाच्या ०२ कार्यशाळांमध्ये सहभाग घेतला.

सत्र २०१७—१८ या शैक्षणिक सत्रात विभागातील प्रा. दिलीप कुमरे यांनी ०५ आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये शोध निबंध प्रकाशित केले व त्यांनी समाजशास्त्र विषयाच्या ०२ कार्यशाळांमध्ये सहभाग घेतला.

# Yearly Inauguration ofBoard of SOCIOLOGY


















# Departmental Seminar



9638 STUDIO AGRASEN MO-- 9850722655



9640 STUDIO AGRASEN MO-- 9850722655



## Visit to Government Children's Observation Home & Rehabilitation Centre







# Study Tour Organized By Department of Sociology





" आदिवासीमध्ये अंगात देवी येणे प्रथेचे निरीक्षण करतांना विद्यार्थी व प्राध्यापक वृंद"



" जैन धर्माचे सामाजिक महत्व जाणून घेण्यासाठी जैन धर्माचे श्रध्दास्थान मौजा मुक्तागिरी (म.प्र) येथे विद्यार्थी व प्राध्यापकांची भेट"

**Workshop Organized By Department Of Sociology**



# Seminar on "Effects of Drug Addiction"








# Departmental Visit to INDUSTRIAL EXHIBITION













# SITABAI ARTS, COM. & SCIENCE COLLEGE, AKOLA

## UG & PG DEPT. OF SOCIOLOGY

## Annual Activity conducted under Department of Sociology

## Session (2018-2019)

# Annual Activity conducted under Department of Sociology

## सत्र : २०१८—२०१९

### १) समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन :—

समाजशास्त्र विभागात दि. १३/०९/२०१८ रोजी समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन करण्यात आले कार्यक्रमाचे उद्घाटक व वक्ते म्हणून श्री. भाऊसाहेब लहाने महाविद्यालय, पिंजर येथील समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. अनिल ठाकरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष विभागप्रमुख डॉ. दिनकर उंबरकर तर प्रमुख अतिथी म्हणून राज्यशास्त्र विभागाचे डॉ. बाळासाहेब जोगदंड उपस्थित होते.

या प्रसंगी समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून कु.पल्लवी टिकार एम.ए. भाग—२ व सचिव म्हणून कु.पल्लवी काळंके एम. ए. भाग — १ यांची निवड करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी समाजशास्त्र अभ्यास मंडळाची कार्यपध्दती व विविध आव्हाने यांच्याविषयी मार्गदर्शन केले.

### २) चर्चासत्र व उद्बोधन वर्गाचे आयोजन :—

समाजशास्त्र विभागांतर्गत दि.०७/०१/२०१९ रोजी 'शेतकरी आत्महत्या नियंत्रणात शासकीय—गैरशासकीय संस्थांचे योगदान' या विषयावर पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री धाबेकर महाविद्यालय खडकी, (अकोला) येथील समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. अमरिष गावंडे उपस्थित होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ.दिनकर उंबरकर उपस्थित होते. याप्रसंगी पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी शोध निबंधांचे वाचन केले. तसेच उपस्थित विद्यार्थ्यांना चर्चासत्राचे अध्यक्ष डॉ. दिनकर उंबरकर आणि प्रमुख मार्गदर्शक प्रा. अमरिष गावंडे यांनी मार्गदर्शन . केले

### ३) वर्गामध्ये आयोजित गट चर्चा व चर्चासत्र :—

**अ.** विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी बी. ए. भाग—१ च्या विद्यार्थ्यांकरीता 'सामाजिक दर्जाचे मानवी जीवनातील महत्व' या विषयावर गट चर्चा दि. ११/१०/२०१८ रोजी आयोजित करण्यात आली. सदर गट चर्चेमध्ये ४४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**ब.** दि. ०३/०९/२०१८ रोजी बी. ए. भाग – १, २ व ३ च्या विद्यार्थ्यांकरीता 'समाजशास्त्राचे दैनंदिन जीवनातील योगदान' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. यामध्ये एकूण ७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**क.** दि. २८/१२/२०१८ रोजी बी. ए. भाग – २ व एम. ए. भाग – १ च्या विद्यार्थ्यांकरीता 'ग्रामीण जातीव्यवस्थेचे बदलते स्वरुप' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये बी. ए. भाग–२ चे २५ व एम. ए. भाग–१ चे ३४ असे एकूण ५९ विद्यार्थी सहभागी झाले.

**४) अभ्यास दौऱ्याचे आयोजन :–**

दि. २२ व २४ फेब्रुवारी २०१९ रोजी विभागातील सहायक प्राध्यापक श्री. दिलीप दामु कुमरे यांच्या आयोजनात व विभागप्रमुख डॉ. दिनकर उंबरकर यांच्या मार्गदर्शनात मौजा पारडसिंगा (काटोल), दीक्षाभूमि (नागपूर), ड्रॅगन पॅलेस (कामठी) श्री रामतीर्थ क्षेत्र (रामटेक) येथे ऐतिहासिक, पर्यावरणीय व सामाजिक, सांस्कृतिक अध्ययनाचे दृष्टीने अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले. या अभ्यास दौऱ्यात विद्यार्थ्यांनी तथ्यांचे संकलन करुन आपला अहवाल समाजशास्त्र विभागात सादर केला.

**५) गुणवत्ता यादी व गुणवंत विद्यार्थी :–**

दरवर्षी प्रमाणे याही सत्रात विभागातील कु. जयश्री पंजाबराव काळे हिने सं.गा.बा. अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी २०१८ च्या वार्षिक परिक्षेत विद्यापीठातून समाजशास्त्र विषयाच्या गुणवत्ता यादीत अनुक्रमे ०५ स्थान प्राप्त केले.

**६) शैक्षणिक परिषदेवर नियुक्ती :–**

विभागप्रमुख डॉ. दिनकर उंबरकर यांची सं. गा. बा. अमरावती विद्यापीठाच्या समाजशास्त्र अभ्यास मंडळावर कुलगुरुद्वारा पीजी टिचर प्रवर्गातुन नामनिर्देशित सदस्य म्हणून निवड झाली.

तसेच विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. सुनिल गायगोळ यांची सुध्दा सं. गा. बा. अमरावती विद्यापीठाच्या समाजशास्त्र अभ्यास मंडळावर कुलगुरुद्वारा नॉन हेड प्रवर्गातुन नामनिर्देशित सदस्य म्हणून निवड झाली.

७)    **संशोधन क्षेत्रातील योगदान :—**

विभागातील डॉ. सुनिल प्रल्हाद गायगोळ यांनी 'अकोला जिल्हयातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक समाजशास्त्रीय अध्ययन' या विषयावर शोध प्रबंध सादर करुन सं.गा.बा. अमरावती विद्यापीठाची आचार्य पदवी (पीएच.डी.) प्राप्त केली.

सत्र २०१८—१९ मध्ये महाविद्यालयाला सं. गा. बा. अमरावती विद्यापीठा अंतर्गत मानव्ये व समाज विज्ञान शाखेमध्ये 'समाजशास्त्र' विषयात आचार्य पदवीकरिता संशोधन केंद्राची मान्यता मिळाली. या संशोधन केंद्रात विभाग प्रमुख डॉ. दिनकर उंबरकर व डॉ. सुनिल प्रल्हाद गायगोळ यांना आचार्य पदवीचे मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळाली.

या शैक्षणिक सत्रात विभागप्रमुख डॉ. दिनकर उंबरकर यांनी यु.जी.सी. मान्यता प्राप्त आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय जर्नल्समध्ये ०९ शोध निबंध प्रकाशित केले व ०२ कार्यशाळांमध्ये सहभागी झाले.

विभागातील सहायक प्राध्यापक डॉ. सुनिल गायगोळ यांनी या शैक्षणिक सत्रात यु.जी.सी. मान्यता प्राप्त आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय जर्नल्समध्ये ०७ शोध निबंध प्रकाशित केले.

विभागातील सहाय्यक प्राध्यापक श्री. दिलीप दामु कुमरे यांनी या शैक्षणिक सत्रात यु.जी.सी.मान्यता प्राप्त आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय जर्नल्समध्ये ०७ शोध निबंध प्रकाशित केले व ०२ कार्यशाळांमध्ये सहभागी झाले.

# Inauguration of Board of Sociological Studies









# Seminar On "Reasoning of Farmers' Suicide"








# Study Tour Organized By Department of Sociology





"देवी पॉईंट चिखलदरा, भजन सादर करतांना भक्तगण व भजनाचे समाजातील/समाज प्रबोधनातील स्थान जाणून घेतांना विद्यार्थी व प्राध्यापक वृंद"




"मौजा चिखलदरा :- गाविलगड किल्ल्याचे प्रवेशद्वार व किल्ल्याबद्दल माहिती जाणून घेण्यासाठी प्रवेश करतांना विभाग प्रमुख डॉ. उबेरकर व विद्यार्थी गण"

# Extension Activity for OLD AGE HOME









# Departmental visit to Deaf & Dumb School









# Seminar Organized by Department of Sociology









# चर्चासत्र –सामाजिकसिध्दांताचेमहत्व








# Departmental Visit to Small Industry EXHIBITION











# VISIT TO EMPLOYMENT FAIR

















# SITABAI ARTS, COM. & SCIENCE COLLEGE, AKOLA

## UG & PG DEPT. OF SOCIOLOGY

## Annual Activity conducted under Department of Sociology

## Session (2019-2020)

# Annual Activity conducted under Department of Sociology

## सत्र : २०१९—२०२०

### १) समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन :—

विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी दरवर्षीप्रमाणे या सत्रात दि. १२/०९/२०१९ रोजी पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटक व वक्ते म्हणून श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी, अकोला येथील प्रा. डॉ.बळीराम अवचार उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष विभागप्रमुख डॉ.दिनकर उंबरकर तर प्रमुख अतिथी म्हणून इंग्रजी विभागप्रमुख डॉ. आर. आर. रणपिसे उपस्थित होते.

याप्रसंगी समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून कु. आरती पाचपोर एम.ए. भाग—१ व सचिव म्हणून लखन तिवारी एम.ए.भाग—२ यांची निवड करण्यात आली. उपस्थित सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या भविष्यकालीन प्रगतीसाठी समाजशास्त्र अभ्यास मंडळाची असणारी आवश्यकता, विद्यार्थ्यांचा विविध कार्यक्रमातील सहभाग, विद्यार्थ्यांसमोरील विविध आव्हाने आणि या मंडळाच्या यशस्वीतेसाठी आवश्यक असणाऱ्या रणनितीबद्दल मार्गदर्शन केले.

### २) चर्चासत्र व उद्बोधन वर्गाचे आयोजन :—

विभागांतर्गत दि. ०९/०१/२०२० रोजी ''आधुनिक जीवन पध्दतीची समाजापुढील आव्हाने : कारणे व उपाय'' या विषयावर पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री. धाबेकर कला महाविद्यालय, खडकी, अकोला येथील समाजशास्त्र विभागप्रमुख, प्रा. अमरिष गावंडे उपस्थित होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ. दिनकर उंबरकर उपस्थित होते. या चर्चासत्रात अनेक पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विद्यार्थ्यांनी आपल्या शोध निबंधाचे वाचन केले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या शोध निबंधाचे मूल्यमापन आणि विश्लेषण करुन विद्यार्थ्यांना भावी आयुष्याच्या वाटचालीकरीता यथोचित असे बहुमूल्य मार्गदर्शन केले.

३) **वर्गामध्ये आयोजित गट चर्चा व चर्चासत्र :—**

**अ.** विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी दि. ०७/१०/२०१९ रोजी बी.ए. भाग—१ व २ च्या विद्यार्थ्यांकरीता 'सामाजिक नियंत्रणाचे समाजातील योगदान' या विषयावर चर्चासत्र करण्यात आले यामध्ये एकूण ४४ विद्यार्थी सहभागी झाले.

**ब.** दि. १३/०२/२०२० रोजी बी.ए.भाग—१ व एम.ए.भाग—१ च्या विद्यार्थ्यांकरीता 'कुटूंब संस्थेचे भवितव्य' या विषयावर गट चर्चेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये एकूण ५७ विद्यार्थी सहभागी झाले.

**क.** दि. १५/०२/२०२० रोजी बी.ए.भाग—३ व बी.ए.भाग—२ च्या विद्यार्थ्यांकरीता 'विवाहाचे बदलते स्वरुप' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. यामध्ये एकूण ५२ विद्यार्थी सहभागी झाले.

४) **अभ्यास दौऱ्यांचे आयोजन :—**

ऐतिहासिक व पर्यावरणविषयक अध्ययन आणि जनजागृती तसेच सामाजिक व सांस्कृतिक अध्ययनाच्या उद्देश्यपूर्तीकरीता दि. १८ व १९ जानेवारी २०२० रोजी विभागप्रमुख डॉ. दिनकर उंबरकर यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रा. दिलीप दामु कुमरे यांच्या आयोजनात वेरुळ, दौलताबाद व औरंगाबाद येथे शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले. या अभ्यास दौऱ्यात विद्यार्थ्यांनी विविध सामाजिक, ऐतिहासिक, पर्यावरणविषयक माहितीचे प्रत्यक्ष संकलन करुन आपला अहवाल सादर केला.

दि.२८/०१/२०२० रोजी वृध्दांच्या समस्या जाणून घेण्यासाठी प्रा. डॉ. सुनिल प्रल्हाद गायगोळ यांच्या आयोजनात मातोश्री वृध्दाश्रम, खडकी अकोला येथे पदवी व पदव्युत्तर विभागातील विद्यार्थी व प्राध्यापकांनी भेट दिली. या भेटी दरम्यान वृध्दांचे वास्तविक जीवन आणि त्यांच्या समस्यांचा अभ्यास प्रत्यक्ष विद्यार्थ्यांनी करुन घेतला.

५) **गुणवंत विद्यार्थी व गुणवत्ता यादी :—**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने उन्हाळी २०१९ च्या प्रसिध्द केलेल्या गुणवत्ता यादीत पदव्युत्तर समाजशास्त्र विभागातील विद्यार्थीनी कु.पल्लवी गोविंदराव टिकार यांनी प्रथम स्थान प्राप्त केले. विद्यापीठात प्रथम स्थान प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्याला दिला जाणारा वेदान्ततिर्थ स्व.रामचंद्र मुरकुटे स्मृतीप्रित्यर्थ सुवर्णपदक हे विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात या विद्यार्थीनीला प्रदान करण्यात आले.

विभागातील माजी विद्यार्थी श्री.गणेश रामकृष्ण मानकर यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे अंतर्गत घेतल्या जाणारी सेट (राज्य शैक्षणिक पात्रता परीक्षा), जून २०१९ समाजशास्त्र विषयात उत्तीर्ण केली.

**६) संशोधन क्षेत्रातील योगदान :—**

विभागप्रमुख डॉ. दिनकर उंबरकर यांचे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या बी. ए.भाग—१ समाजशास्त्र विषयाच्या अभ्यासक्रमानुसार 'समाजशास्त्र' या नावाचे पुस्तक प्रकाशित झाले.

डॉ. दिनकर उंबरकर यांच्या मार्गदर्शनात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठांतर्गत दोन विद्यार्थ्यांना आचार्य पदवी प्राप्त झाली तसेच जेजेटी विद्यापीठ, राजस्थान अंतर्गत समाजशास्त्र विषयात दोन विद्यार्थ्यांनी आचार्य पदवी प्राप्त केली.

या सत्रात डॉ. दिनकर उंबरकर यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये ०५ शोध निबंध प्रकाशित केले.


विभागातील डॉ. सुनिल गायगोळ यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये ०४ शोधनिबंध प्रकाशित झाले.

विभागातील प्रा. दिलीप दामु कुमरे यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्मसध्ये ०३ शोधनिबंध प्रकाशित केले.

**७) प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची सुरुवात :—**

विभागा अंतर्गत या सत्रात 'व्यावहारिक समाजशास्त्र' या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची सुरुवात करण्यात आली. दि. ७ सप्टेंबर २०१९ रोजी विभाग प्रमुख डॉ. दिनकर उंबरकर यांच्या उपस्थितीत या अभ्यासक्रमाचे उदघाटन करण्यात आले. या अभ्यासक्रमाला एकुण २५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. या अभ्यासक्रमाचा भाग म्हणून 'वृध्दाश्रमाचे सामाजिक दृष्टिकोनातुन अध्ययन' हा प्रकल्प राबविण्यात आला.

# Inauguration of Board of Sociology





दिव्य मराठी

## 'समाजाविषयीची कर्तव्ये विद्यार्थ्यांनी पूर्ण करावी'

## समाजशास्त्र अभ्यास मंडळाच्या अध्यक्षपदी योगेश गावंडे



# Seminar on “Importance of Culture”







# Study Tour Organized By Department of Sociology









# Inauguration of APPLIED SOCIOLOGY









# Problems of Deaf & Dumb Students






# ONE DAY WORKSHOP





# Departmental Visit to Maratha Armar EXHIBITION









# SITABAI ARTS, COM. & SCIENCE COLLEGE, AKOLA

## UG & PG DEPT. OF SOCIOLOGY

## Annual Activity conducted under Department of Sociology

## Session (2020 - 2021)

# Annual Activity conducted under Department of Sociology

## सत्र : २०२०—२०२१

**१) ऑनलाईन प्रश्नमंजुषा आणि टेस्ट सिरीज आयोजन —**

जागतिक महामारी कोरोनामुळे महाविद्यालय बंद असल्यामुळे ऑनलाईन पध्दतीने कोरोना—१९ विषयी जनजागृती निर्माण करण्याकरिता प्रश्नमंजुषा आयोजित करुन विद्यार्थ्यांना त्यामध्ये सहभागी करुन घेण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध प्रश्नमंजुषांचे ऑनलाईन लिंक पाठवून कोरोना बददल त्यांच्या मनात जनजागृती निर्माण करुन प्रमाणप्रत्र प्राप्त करण्यात आले. विद्यार्थ्यांना अभ्यासाचा सराव व्हावा म्हणून समाजशास्त्र विषयाच्या प्रत्येक वर्गाच्या ऑनलाईन टेस्ट सिरीज आयोजित करण्यात आल्या.

**२) ऑनलाईन प्रतिज्ञा वाचन कार्यक्रम —**

जागतिक महामारी कोरोना मुळे ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थ्यांचा शैक्षणिक उपक्रमांमध्ये सहभाग वाढावा या दृष्टिकोनातुन प्रा. डॉ. सुनिल प्रल्हाद गायगोळ यांनी ऑनलाईन विविध प्रतिज्ञा वाचन कार्यक्रमांचे आयोजन केले. या मध्ये "संविधान की उद्देशिका की शपथ, घर पर रहे, जीवन बचाएं, कोरोना योध्दा शपथ, दहेज विरोधी शपध, राष्ट्रीय एकता दिवस शपथ, युवा शपथ, महिला अधिकार शपथ इत्यादी" प्रतिज्ञा वाचन कार्यक्रम विद्यार्थ्यांकडुन ऑनलाईन करुन प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आले.

**३) संशोधन क्षेत्रातील योगदान :—**

या सत्रात महाविद्यालयात आचार्य पदवीकरिता सुरु असलेल्या संशोधन केंद्रात विभाग प्रमुख डॉ. दिनकर उंबरकर व डॉ. सुनिल प्रल्हाद गायगोळ यांच्या मार्गदर्शनात अनुक्रमे सहा व दोन विद्यार्थ्यांना आचार्य पदवीकरिता संशोधन करण्यासाठी सं. गा. बा. अमरावती विद्यापीठाने मान्यता प्रदान केली.

विभागप्रमुख डॉ. दिनकर उंबरकर यांचे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या बी. ए. भाग—३ समाजशास्त्र विषयाच्या अभ्यासक्रमानुसार 'सामाजिक मानवशास्त्र' या नावाचे पुस्तक प्रकाशित झाले. तसेच त्यांचे आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये ०४ व राष्ट्रीय जर्नल्समध्ये ०१ शोध निबंध प्रकाशित झाले.

विभागातील डॉ. सुनिल प्रल्हाद गायगोळ यांना यु.जी.सी. व्दारा पुरस्कृत 'आदिवासींच्या मानवाधिकाराचे समाजशास्त्रीय अध्ययन' या विषयावरील लघु शोध प्रकल्प (MRP) पूर्ण केला. तसेच त्यांनी आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये ०४ शोध निबंध व ०१ पुस्तकामध्ये शोध निबंध प्रकाशित केला.

विभागातील प्रा. दिलीप कुमरे यांनी ०४ आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये शोध निबंध प्रकाशित केले व समाजशास्त्र विषयाच्या ०१ कार्यशाळेमध्ये सहभाग नोंदविला.

**४) प्रमाणपत्र अभ्यासक्रमाअंतर्गत प्रकल्प :—**

या सत्रात कोरानाच्या प्रादुर्भावामुळे व्यावहारिक समाजशास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा आवश्यक भाग म्हणून वर्णनात्मक पध्दतीने विद्यार्थ्यांनी घरी राहुनच 'आदिवासींच्या शैक्षणिक व आरोग्यविषयक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन' या विषयावर शोध निबंधाचा सराव केला.


**५) ऑनलाईन राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन :—**

दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी, अकोला द्वारा संचालित संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोलाचे समाजशास्त्र विभाग, निरंतर शिक्षण व विस्तार विभाग संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती तथा श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी अकोला यांचे संयुक्त विद्यमाने ''भारतीय आदिवासी: काल, आज आणि उद्या'' या संकल्पनेवर आधारित ऑनलाईन राष्ट्रीय चर्चासत्राचे दि. ३०/०८/२०२१ रोजी आयोजन करण्यात आले. या चर्चासत्रामध्ये संपूर्ण भारतामधून १०४ प्रतिनिधींनी सहभाग नोंदविला.

**६) गुणवत्ता यादी व गुणवंत विद्यार्थी :—**

दरवर्षी प्रमाणे याही सत्रात समाजशास्त्र विभागातील कु. सुष्मा निळकंठ डोंगर तसेच कु. नुतन प्रभुदास थोरात यांनी सं.गा.बा. अमरावती विद्यापीठाच्या एम. ए. समाजशास्त्र उन्हाळी २०१९ च्या वार्षिक परिक्षेत विद्यापीठातून समाजशास्त्र विषयाच्या गुणवत्ता यादीत अनुक्रमे तिसरे व नववे स्थान प्राप्त केले.

# Online National Seminar








The Berar General Education Society's

**Sitabai Arts, Commerce & Science College, Akola**

NAAC Accredited 'A' Grade

(Affiliated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati)

**Department of Sociology**

In Collaboration with

Dept. of Lifelong Learning & Extention, Sant Gadge Baba Amravati University, Amravati

&

Smt. Panchphula Devi Patil College of Social Work, Khadki Akola

*Certificate*

This is to certify that Mr./Ms./Prof./ has participated in Online National Conference on "Indian Tribes : Past, Present & Future" Organized by the Department of Sociology, Sitabai Arts, Commerce & Science College, Akola, on 30th August 2021. He/She attended / presented a paper entitled

Dr. R. D. Sikchi
Principal & Convenor

Dr. D. E. Umbarkar
Professor & HOD Dept. of Sociology




दैनिक **जनमाध्यम**

• अकोला, गुरुवार १४ ऑक्टोबर २०२१ — एक प्रतिष्ठित सवय

## सीताबाई महाविद्यालयात 'आदिवासी काल, आज आणि उद्या' या विषयावर आभासी चर्चासत्र


# Valedictory of Applied Sociology









## Seminar On "Personality Development"







# News Reading & Analysis


















# Group Discussion on – Impact of Divorce










# Changing Status of Women in India





# SITABAI ARTS, COM. & SCIENCE COLLEGE, AKOLA

## UG & PG DEPT. OF SOCIOLOGY

## Annual Activity conducted under Department of Sociology

## Session (2021 - 2022)

# Annual Activity conducted under Department of Sociology

## सत्र : २०२१—२०२२

**१) उद्बोधन वर्गाचे (Induction Program) आयोजन :—**

दि. २० सप्टेंबर ते २५ सप्टेंबर २०२१या कालावधीत विद्यापीठाच्या शैक्षणिक पत्रकानुसार समाजशास्त्र विभागात नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी उद्बोधन वर्गाचे (Induction Program) आयोजन करण्यात आले. नवीन विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या कार्यपद्धतीची ओळख व्हावी व समाजशास्त्र विषयाची व्यावहारिक माहिती व्हावी या उदेश्याने विभाग प्रमुख डॉ. सुनील गायगोळ यांच्या मार्गदर्शनात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**२) समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे उदघाटन :—**

दरवर्षी प्रमाणे पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभागात दि. २ आक्टोंबर २०२१ रोजी 'गांधी जयंती' निमित्त 'समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे' उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटक व वक्ते म्हणून श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खंडकी अकोला येथील समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. बळीराम अवचार उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष विभागप्रमुख डॉ. सुनिल प्रल्हाद गायगोळ तर प्रमुख अतिथी म्हणून इतिहास विभागातील डॉ. संतोष कुळकर्णी उपस्थित होते.

याप्रसंगी समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून आशिष डोंगरे व सचिव म्हणून श्री. वडतकार यांची निवड करण्यात आली. उपस्थित सर्व मान्यवरांनी समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे विद्यार्थी जीवनातील महत्व व समााजिक कार्यातील सहभागांचे विविध उदाहरणांव्दारे मार्गदर्शन केले.

**३) ऑनलाईन प्रतिज्ञा वाचन कार्यक्रम** — याही सत्रात जागतिक महामारी कोरोना मुळे ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थ्यांचा शैक्षणिक उपक्रमांमध्ये सहभाग वाढावा या दृष्टिकोनातुन प्रा. डॉ. सुनिल प्रल्हाद गायगोळ यांनी ऑनलाईन विविध प्रतिज्ञा वाचन, यामध्ये "संविधान की उद्देशिका की शपथ, दहेज विरोधी शपध, राष्ट्रीय एकता दिवस शपथ, युवा शपथ, महिला अधिकार शपथ इत्यादी" प्रतिज्ञा वाचन कार्यक्रम विद्यार्थ्यांकडुन ऑनलाईन पध्दतीने पूर्ण करुन घेण्यात आले.

**४) रिसर्च जर्नलचे प्रकाशन :—** सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला तसेच पंचफुलादेवी पाटील समाज कार्य महाविद्यालय, खडकी यांच्यातील शैक्षणिक कराराच्या अनुषंगाने 'आधार' या आंतरराष्ट्रीय जर्नलचे प्रकाशन दि. २ आक्टोबर

२०२१ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. डी. सिकची यांच्या हस्ते करण्यात आले. 'Indian Tribes : Past, Present and Future' या विषयावर ५४ प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थ्यांनी आपले शोध निबंध प्रकाशित केले.

**५) अभ्यास दौऱ्याचे आयोजन –**

समाज जीवनाचा पाया असणाऱ्या वृद्ध व्यक्तींच्या जीवनांचा आणि त्यांच्या समस्यांचा शास्त्रीय अभ्यास करण्याकरिता दिनांक १४ मे २०२२ रोजी एक दिवसीय अभ्यास दौऱ्याचे आयोजन विभाग प्रमुख डॉ. सुनील गायगोल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. खडकी परिसरातील ''मातोश्री'' वृद्धाश्रमाला समाजशास्त्र विभागातील विद्यार्थी आणि प्राध्यापक मंडळी यांनी प्रत्यक्ष भेट देऊन वृद्धांच्या समस्या जाणून घेतल्या व त्या संदर्भात अहवाल तयार करण्यात आला.

**६) गुणवत्ता यादी व गुणवंत विद्यार्थी :–** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी २०२१ या परीक्षेमध्ये पदव्युत्तर समाजशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी दैदिप्यमान यश संपादन केले. पदव्युत्तर समाजशास्त्र विभागाची यशाची परंपरा कायम ठेवत विभागातील आठ विद्यार्थ्यांनी विद्यापीठाने जाहीर केलेल्या उन्हाळी २०२१ परीक्षेच्या गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त केले.

यामध्ये अनुक्रमे कु. अलका मनोहर कोकाटे हीने प्रथम येण्याचा मान मिळवून विद्यापीठाद्वारे प्रथम स्थान प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यास दिले जाणारे सुवर्णपदक प्राप्त केले. त्यासोबतच श्री दीपक वानखडे द्वितीय मेरीट, कु. सोनल राऊत तृतीय मेरीट, कु. दुर्गा पाखरे चौथी मेरिट, कु. वैशाली पांडे चौथी मेरिट, कु. पल्लवी भांगे सातवी मेरीट, कु. ऐश्वर्या मोरे आठवी मेरिट व श्री अक्षय बोबडे यांनी दहावा मेरीट येण्याचा मान मिळवला.

७) **प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची सुरुवात :–** दि. ९ ऑक्टोबर २०२१ रोजी विद्यार्थ्यांना समाजशास्त्र विषयाचे व्यावहारिक ज्ञान प्राप्त व्हावे या उद्देश्याने 'व्यावहारिक समाजशास्त्र' या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा उद्घाटन सोहळा विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुनिल प्रल्हाद गायगोळ यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडण्यात आला.

**८) संशोधन क्षेत्रातील योगदान :–**

समाजशास्त्र विभाग प्रमुख प्राध्यापक डॉ. सुनील प्रल्हाद गायगोल यांचे आंतरराष्ट्रीय जर्नल मध्ये तीन शोधनिबंध व ०१ पुस्तकात शोध निबंध प्रकाशित झाले तसेच विभागातील प्रा. दिलीप कुमरे यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये तीन शोधनिबंध प्रकाशित केले.

# INDUCTION PROGRAMME







# Inauguration of Board of Sociology









# Publication Ceremony of International





Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

**B.Aadhar**

Peer Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

August-2021

SPECIAL ISSUE - (CCCXIII) 313

Indian Tribes : Past,Present & Future

Chief Editor
Prof. Virag.S.Gawande
Director
Aadhar Social
Research &, Development
Training Institute, Amravati.

Executive Editors
Dr. R. D. Sikchi,
Principal,
Dr. D. E. Umbarkar,
Professor & HOD Sociology,
Sitabai Arts, Commerce & Science
College, Akola

Editors
Dr. Sunil P. Gaygol,
Associate Professor, Dept. of Sociology,
Prof. Dilip D. Kumare,
Assistant Professor,
Sitabai Arts, Commerce & Science
College, Akola

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com Aadhar Publications

# Visit to Old Age Home








# Valedictory Function of Applied Sociology








# MoU Activity - Students Exchange Programme







# News Reading & Analysis














# One-Day Seminar On 'Report Writing'





# Group Discussion — Population Policy in India










# Departmental Visit to SELF HELP GROUP

















# SITABAI ARTS, COM. & SCIENCE COLLEGE, AKOLA

## UG & PG DEPT. OF SOCIOLOGY

## Annual Activity conducted under Department of Sociology

## Session (2022 - 2023)

# Annual Activity conducted under Department of Sociology

## सत्र : २०२२—२०२३

### १) उद्‌बोधन वर्गाचे (Induction Program) आयोजन :—

समाजशास्त्र विभागात दि. २५जुलै ते ३० जुलै या कालावधीत सत्र २०२२—२३ करिता नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयाच्या कार्यपद्धतीची ओळख व्हावी व त्यासोबतच समाजशास्त्र विषयाच्या अध्ययन व अध्यापनाने विद्यार्थ्यांना भविष्यात उपलब्ध होणाऱ्या विविध रोजगार व स्वयंरोजगारांच्या संधीची माहिती व्हावी या उद्देशाने विभागाचे विभाग प्रमुख डॉ. सुनील गायगोळ यांच्या मार्गदर्शनात उद्‌बोधन वर्गाचे (Induction Program) आयोजन करण्यात आले याप्रसंगी विभाग प्रमुख डॉ.सुनील गायगोळ, प्रा. दिलीप कुमरे, डॉ. स्नेहल चिमणकर, प्रा. योगेश कराळे, डॉ.सपना डोंगरे, प्रा. जया जोशी यांनी विद्यार्थ्यांचे उद्‌बोधन केले.

### २) समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्‌घाटन :—

समाजशास्त्र विभागात दि. ५ ऑगस्ट २०२२ रोजी समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्‌घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्‌घाटक व वक्ते म्हणून महाविद्यालयाशी सामंजस्य करार (MOU) असलेल्या श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय खडकी, अकोला येथील समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बळीराम अवचार उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. सुनील गायगोळ तर प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. बाळासाहेब जोगदंड उपस्थित होते. याप्रसंगी समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून नितेश संतोष चंडाले एम.ए भाग २ व सचिव म्हणून कु. निशा अशोक परतीते एम.ए भाग १ या विद्यार्थ्यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी समाजशास्त्र विषयाच्या कार्यपद्धतीबद्दल, विषयात उपलब्ध असणाऱ्या संधी बद्दल व भविष्यात येणाऱ्या आव्हानांबद्दल मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्रा. दिलीप कुमरे, प्रा.योगेश कराळे, डॉ.स्नेहल चिमणकर, डॉ.सपना डोंगरे व प्रा. जया जोशी यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी विभागातील बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

३) **वर्गामध्ये आयोजित परिसंवाद व गटचचा :—**

या सत्रात महाविद्यालयातील बी.ए भाग—३ समाजशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी दि १५ नोव्हेंबर २०२२ रोजी ''आदिवासी समुदायाचे बदलते स्वरूप'' या विषयाला अनुसरून परिसंवाद व ''नागरीकरणाचा आदिवासी समुदायावर पडलेला प्रभाव'' या विषयावर गट चर्चेचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी ४२ विद्यार्थ्यांनी परिसंवाद व गट चर्चेमध्ये सहभाग घेतला. परिसंवाद व गटचर्चा आयोजनात विभाग प्रमुख डॉ. सुनील गायगोळ यांचे मार्गदर्शन लाभले तर या कार्यक्रमाप्रसंगी प्रा. दिलीप कुमरे, प्रा. योगेश कराळे, डॉ स्नेहल चिमणकर, डॉ.सपना डोंगरे व प्रा. जया जोशी यांनी मार्गदर्शन केले.

४) **वर्गामध्ये आयोजित चर्चासत्र :—**

विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी पदव्युत्तर समाजशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांसाठी दि २ डिसेंबर २०२२ रोजी ''भारतीय समाजव्यवस्था व कोरोना काळ'' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या चर्चासत्राच्या माध्यमातून सहभागी विद्यार्थ्यांनी कोरोना काळात भारतीय समाज व्यवस्थेवर झालेले परिणाम व कोरोना काळानंतर भारतीयांच्या मानसिक प्रवृत्तीत झालेल्या स्थित्यंतराबद्दल आपापल्या दृष्टिकोनातून विचार व्यक्त केले याप्रसंगी ३० विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष चर्चासत्रामध्ये सहभाग घेतला तर बहुसंख्य विद्यार्थी सदर चर्चासत्राला उपस्थित होते.

५) **अभ्यास दौऱ्यांचे आयोजन :—**

**अ)** दि. २९ डिसेंबर २०२२ रोजी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे आयोजित "भव्य कृषी प्रदर्शनी व चर्चासत्राला" महाविद्यालयाच्या पदव्युत्तर समाजशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांना क्षेत्रीय कृषीक्षेत्राबद्दल ज्ञान अवगत व्हावे या उद्देशाने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. डी. सिकची व विभागाचे विभागप्रमुख डॉ. सुनील गायगोळ यांच्या मार्गदर्शनात व विभागातील डॉ. स्नेहल चिमणकर, डॉ. सपना डोंगरे तथा प्रा. जया जोशी यांच्या नेतृत्वात भेट देण्यात आली या क्षेत्र भेटी दरम्यान विद्यार्थ्यांना कृषी संदर्भात निगडित असणाऱ्या विविध उपक्रमासंबंधी माहितीचे जवळून अनुभव करण्यास मदत झाली. यादरम्यान विद्यार्थ्यांना शेतकऱ्यांच्या समस्या, शेतीत वापरली जाणारी अत्याधुनिक तंत्रे व अवजारांद्वारे शेतकऱ्यांना झालेल्या नफ्या—तोट्या संदर्भात अत्यावश्यक माहिती प्राप्त झाली.

**ब)** दि. २ जानेवारी २०२३ रोजी समाजशास्त्र विभागाअंतर्गत आदिवासी जीवनाची परिपूर्ण माहिती व्हावी व आदिवासींच्या समस्या निराकरणासाठी उपाययोजना सुचविण्यात मोलाचे सहकार्य लाभावे या उद्देशाने विभाग प्रमुख डॉ. सुनील गायगोळ यांच्या मार्गदर्शनात विभागातील प्रा. दिलीप कुमरे यांच्या नेतृत्वात मेळघाटातील आदिवासींच्या संपूर्ण जीवनाचे विद्यार्थ्यांना आकलन होण्याच्या दृष्टिकोनातून आदिवासी जीवन दर्शन दौऱ्याचे आयोजन करण्यात आले. या अभ्यास दौऱ्यात विद्यार्थ्यांनी आदिवासी जीवन व संस्कृती बद्दल माहिती जाणून घेतली व माहितीचे संकलन करून त्या अभ्यास दौऱ्याचा अहवाल विभागात सादर केला.

**६) प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा निरोप समारंभ :—**

सत्र २०२२—२३ मध्ये व्यावहारिक समाजशास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा निरोप समारंभ दि. २१ में २०२३ पार पडला. या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. एस. आर. दामोदर उपस्थित असून त्यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी विभाग प्रमुख डॉ. सुनिल प्रल्हाद गायगोळ, प्रा. डी. डी. कुमरे, प्रा. योगेश कराळे, डॉ. स्नेहल चिमणकर, डॉ. सपना डोंगरे तथा प्रा. जया जोशी याप्रसंगी उपस्थित होते.

**७) गुणवत्ता यादी व गुणवंत विद्यार्थी :—**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी २०२२ या परीक्षेमध्ये पदव्युत्तर समाजशास्त्र विभागातील कु. संघमित्रा शिरसाट या विद्यार्थीनीने दैदिप्यमान यश संपादन केले. विद्यापीठाने जाहीर केलेल्या गुणवत्ता यादीत आठवी मेरीट येण्याचा मान तिला मिळाला त्याप्रसंगी गोदावरीदेवी मोहता चॅरीटेबल ट्रस्ट, अकोला तर्फे तिला चांदीचे पदक बहाल करण्यात आले.

**८) संशोधन क्षेत्रातील योगदान :—**

विभागप्रमुख डॉ. सुनील गायगोळ यांनी २०२२—२३ या सत्रात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये ०४ शोधनिबंध आणि ०१ राष्ट्रीय स्तरावरील पुस्तकात लेख प्रकाशित केला. तसेच विभागातील प्रा. दिलीप कुमरे यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये ०४ शोधनिबंध प्रकाशित केले.

# INDUCTION PROGRAMME









# Inauguration of Board of Sociology






## Workshop on – Importance of Social Research









# समूहचर्चा–बालगुन्हेगारी





# Group Discussion On 'Violence Against Women








# VISIT TO AGRICULTURE FAIR


















# Study Tour Organized By Department of Sociology





# Inauguration Function of Applied Sociology








# Valedictory Function of Applied Sociology









# Extension Activityfor OLD AGE HOME



















# MoU Activity - Library Visit









## News Reading & Analysis











